# तिफण

वर्ष : १३ वे । अंक १ला । एप्रिल-मे-जून - २०२२



कुळवाडीभूषण

# छत्रपती शिवाजी महाराज

विशेषांक

Scanned with CamScanner

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

**UGC Care Listed Journal**
**ISSN 2231 - 573X**

• संपादक •

## डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद - ४३११०३
मो. ९९०४००३९९८

Scanned with CamScanner

UGC Care Listed Journal ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

## कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक

[भाग-३]

• संपादक •

डॉ. शिवाजी हुसे

• अतिथी संपादक •

डॉ. सर्जेराव जिगे    डॉ. यशवंत सोनुने

• संपादक मंडळ •

डॉ. सुभाष बागल    डॉ. ताहेर पठाण    डॉ. दिलीप बिरुटे
डॉ. सुभाष शेकडे    डॉ. रामचंद्र झाडे    डॉ. प्रेमला मुखेडकर
डॉ. एकनाथ शिंदे    डॉ. दत्तात्रय डुंबरे    डॉ. रंजना कदम
डॉ. राज मुसणे    डॉ. सुखदेव इघारे

मूल्य : २५० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८



Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| १६. | छत्रपती शिवाजी महाराज – तर्कशुद्ध आणि सर्जनशील व्यक्तिमत्त्व<br>- डॉ. महेश भास्कर व डॉ. शिरीष गवळी | ६३ - ६७ |
| १७. | छत्रपती शिवाजी महाराजांची शेती व शेतकऱ्यांविषयीची भूमिका<br>- डॉ. गणेश शिंदे व डॉ. लहू घोरपडे | ६८ - ७० |
| १८. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- सुशीला लक्ष्मण जगधने | ७१ - ७२ |
| १९. | छत्रपती शिवाजी महाराजांचा धार्मिक दृष्टिकोन : चिकित्सक मांडणी<br>- डॉ. विकास मोहन सरनाईक | ७३ - ७६ |
| २०. | शिवरायांचे आरमार आणि दूरदृष्टी<br>- डॉ. श्वेता बा. चौधारे | ७७ - ७९ |
| २१. | शिवकालीन भाषा व लेखनपद्धती<br>- डॉ. सायली आचार्य | ८० - ८४ |
| २२. | मराठी कादंबरी व ग्रंथांमध्ये आलेले छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचे संदर्भ - डॉ. सखाराम डाखोरे | ८५ - ८८ |
| २३. | मराठी कवितेत शिवाजी महाराजांचे चित्रण<br>- योगिता चोडणकर | ८९ - ९३ |
| २४. | शिवकालीन अर्थव्यवस्था : एक अभ्यास<br>- डॉ. कैलास अर्जुनराव ठोंबरे व डॉ. राजाभाऊ गायकवाड | ९४ - ९६ |
| २५. | स्वराज्याचे अधिष्ठान : मुलकी शासनव्यवस्था<br>- अविनाश सुदाम भालेराव | ९७ - १०० |
| २६. | शिवरायांचा स्त्रीविषयक क्रांतिकारी धोरण<br>- शहेनाज देशमुख | १०१ - १०४ |
| २७. | सभासद बखर : महापुरुषांच्या जीवनाच्या उज्ज्वल दीप्तीमध्ये शोकांतिकेची एक अनाकलनीय किनार - कृष्णा रतन बनसोडे | १०५ - १०८ |
| २८. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- किशोर शेषराव चौरे | १०९ - १११ |
| २९. | महात्मा जोतिबा फुले यांच्या पोवाड्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तित्व<br>- डॉ. युवराज धबडगे व नागेश बोंतेवाड | ११२ - ११५ |
| ३०. | छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यकारभार आणि देशातील आजच्या लोकशाहीची झालेली अवस्था - ईश्वर रावसाहेब आडसूळ | ११६ - ११९ |
| ३१. | छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती<br>- डॉ. सुषमा देशपांडे व कविश्री देशमुख | १२० - १२३ |




Scanned with CamScanner



# मराठी कादंबरी व ग्रंथांमध्ये आलेले छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचे संदर्भ

- डॉ. सखाराम डाखोरे

सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, अण्णासाहेब वर्तक मानव्य महाविद्यालय, वसई रोड (प.), जि. पालघर - ४०१ २०२

ई-मेल – ssdakhore2000@gmail.com

भारत हा प्राचीन काळापासूनच प्रजाहितदक्ष राजा-महाराजांचा देश राहिलेला आहे. बहुजन अनार्यांच्या अनेक पराक्रमी व शौर्यसंपन्न राजा-महाराजांनी आपल्या कार्यकर्तृत्वाची छाप समाजमनावर पाडली आहे. बळीराजा, चंद्रगुप्त मौर्य, सम्राट अशोक, महाराणा प्रताप, सम्राट अकबर, राजर्षी शाहू महाराज यांच्याप्रमाणेच छत्रपती शिवाजी महाराजांचे शासनसुद्धा लोकहिताच्या दृष्टिकोनातून महत्त्वपूर्ण होते. आर्य, ग्रीक, शक, हून, कुशान, मुघल, डच, फ्रेंच, पोर्तुगीज, इंग्रज अशा अनेक परकीय टोळ्यांनी किंवा समुदायांनी भारतासारख्या सुपीक भूमीवर वारंवार आक्रमणे केली. भारतीय संस्कृती, परंपरा आणि लोकजीवनावर याचा मोठा परिणाम झालेला आपणांस दिसून येतो. यापैकी बऱ्याच शासकांनी भारतावर अनेक वर्षे राज्य केले. त्यांनी भारतामध्ये निर्माण केलेल्या विशाल राजकीय व्यवस्थेला शह देणे नक्कीच सोपे नव्हते. मुघलांच्या अनेक शतकांच्या राजवटीला हादरवून सोडणेसुद्धा छत्रपती शहाजी महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराजांना नक्कीच सोपे गेले नाही; परंतु त्यांच्या इच्छाशक्तीचा परिणाम आणि गनिमी काव्याचा त्यांनी केलेला प्रयोग नक्कीच हितकारक व स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी मौलिक ठरला.

**मराठी कादंबरी व ग्रंथांमध्ये आलेले छत्रपती शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचे संदर्भ -** मराठी साहित्याच्या प्रांताला विस्तारण्याचे महत्त्वाचे कार्य कादंबरी या वाङ्मयप्रकाराने केले आहे. कादंबरी हा जीवनाचा बहुतांश भाग व्यापणारा साहित्यप्रकार आहे. पौराणिक, राजकीय, सामाजिक, विनोदी, ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, महानगरीय अशा विविध प्रकार व प्रवाहांमध्ये लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्यांप्रमाणेच ऐतिहासिक कादंबरीचे महत्त्वसुद्धा लक्षात घ्यावे लागते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित अनेक कादंबऱ्या मराठी साहित्यप्रांतात दाखल झाल्या आहेत. हरी नारायण आपटे यांची 'उषःकाल', रणजित देसाई यांची 'श्रीमान योगी', शिरीष गोपाळ देशपांडे यांची 'शिवछत्रपती', ना. सं. इनामदार यांची 'राजेश्री' यांबरोबरच संभाजी महाराजांवरील शिवाजी सावंत यांची 'छावा' ही कादंबरी अशा काही प्रमुख कादंबऱ्यांप्रमाणेच नेताजी पालकर यांच्या जीवनावरील 'शिवबाचा शिलेदार' ही ऐतिहासिक कादंबरी, बाजीप्रभू देशपांडे यांच्या जीवनावरील 'पावनखिंड' ही कादंबरी, शिरीष गोपाळ देशपांडे यांची शहाजीराजेंच्या जीवनावरील 'राजा शहाजी' ही कादंबरी अशा अनेक कादंबऱ्यांमधूनही छत्रपती शिवाजी महाराजांवरील प्रसंगवर्णने आली आहेत. त्यांनी आपल्या कारकीर्दीत शत्रूला नामोहरम करण्यासाठी वापरलेले युद्धतंत्र म्हणजेच गनिमी कावा. "लक्ष्यावर आघात करण्यासाठी जवळपास १६७० पर्यंत छत्रपतींनी 'गनिमी काव्या'चा अचूक वापर केला. सैन्यबळ कमी असल्याने ते बलाढ्य शत्रूसैन्याला स्वतःच्या डोंगराळ भागात खेचायचे व मग डोंगरातील कडेकपाऱ्या लीलया हाताळणारे मावळे शत्रूवर तुटून पडायचे."[१] गनिमी काव्यामुळे आपल्या सैन्याची कमीत कमी हानी व्हायची; कारण मुघलांचे सैन्य लाखांत असायचे, तर शिवरायांचे सैन्य हजारांत असायचे म्हणून अशी रणनीती आखणे अत्यंत गरजेचे होते. शत्रूला नामोहरम करणे, त्याची दिशा भटकविणे, शेतीचे नुकसान थांबविणे यासाठी गनिमी कावा वापरला जायचा.

मराठ्यांनी ज्या लढाया केल्या त्यामध्ये आदिलशहा व मुघलांचे सैन्यबळ नक्कीच तुलनेने अधिक होते. शिवाय



Scanned with CamScanner

त्यांच्याकडे असलेला शस्त्रसाठाही विपुल व नावीन्यपूर्ण होता. त्यामुळे छत्रपती शिवरायांनी वापरलेले गनिमी काव्याचे तंत्र आत्मसर्थनार्थ व आत्मसंरक्षणार्थ अत्यंत गरजेचे होते. 'गनीम' या शब्दाचे मूळ फारसी भाषेत असल्याचे आपणांस दिसून येते. गनीम म्हणजे शत्रू. खरेतर गनिमी काव्याने जिंकणे म्हणजे कपटाने जिंकणे, असे पराजितांचे म्हणणे असते; परंतु त्यासाठी आवश्यक असलेली हुशारी व चतुराई मराठ्यांनी दाखविली, हे येथे मान्य करावे लागते. महाराष्ट्र मुलखासाठी लढला तो मराठा, या अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य किती व्यापक व काळाच्या कसोटीवर उतरणारे होते, हे लक्षात येते. गनिमी कावा या तंत्राचा वापर करावयाचा तर निश्तितच नियोजन व विशिष्ट आखणी अत्यावश्यक असते. शत्रूला घाबरवणे, त्याला कोंडीत पकडणे, शत्रूसैन्यास विस्कळीत होण्यास भाग पाडणे, शत्रूला आपल्या मागे येण्यास भाग पाडणे आणि मग आपल्या जाळ्यात ओढणे यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबी गनिमी काव्यात महत्त्वाच्या असतात. अर्थातच, गनिमी काव्यासाठीसुद्धा बुद्धीचा वापर करावा लागतो नाहीतर शत्रूच्या गोटातून सहीसलामत बाहेर पडणे शक्य होत नाही, हे ओळखूनच छत्रपती शिवाजी महाराजांनी या तंत्राचा वापर अतिशय कौशल्यपूर्ण पद्धतीने केल्याचे दिसून येते.

मराठी साहित्य प्रांतात निर्माण झालेल्या अनेक कादंबऱ्यांवरून छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धकौशल्याची आपणांस जाणीव होईल. शिवाजीराजांचे थोरले बंधू संभाजीराजे यांच्या मृत्यूनंतर राजमाता जिजाबाई हतबल होतात; परंतु शिवाजीराजांच्या स्वराज्य संकल्पनेची आशा त्यांना भविष्यकाळाची स्वप्ने दाखवीत होती. "जुन्नर म्हणजे मुघलांची दक्षिणेतील एक मातब्बर पेठ. तटाने मजबूत असलेली. जेथे विजापूरकरांना जुन्नरकडे वाकड्या नजरेने पाहायचे धारिष्ट झाले नाही, तेथे शिवाजी ते धाडस करील, असे कोणाला स्वप्नातही वाटले नाही. जुन्नर चारी बाजूंनी वेढले गेले. पहाऱ्याच्या जागा चुकवून शिड्या लावल्या गेल्या. जुन्नरचा दरवाजा थोड्या चकमकीत उघडला गेला आणि मध्यरात्री राजे घोडदळासह जुन्नरमध्ये प्रवेश करते झाले. एकच कापाकापी सुरू झाली. जुन्नरची पागा मशहूर होती. अस्सल जातिवंत शेकडो घोडी पागेत होती; ठाणबंद होती. ती पागा राजांना मिळाली. तीन लक्ष होनांची मत्ता राजांना मिळाली. त्याखेरीज मौल्यवान कापड, जिन्नस, जडजवाहीर हे वेगळेच पाहता-पाहता जुन्नर लुटून, ती लूट घेऊन राजे चाकणला आले."[2] अर्थातच शिवरायांच्या सर्व योजना या स्वराज्याच्या उभारणीसाठीच होत्या. सर्व बाबी कमी प्रमाणात असल्यामुळे शिवरायांना विविध युक्त्या व क्लृप्त्यांचा आधार घ्यावा लागला, त्यासाठीच आपल्या अफाट बुद्धिमत्तेचा वापर त्यांनी केलेला दिसून येतो.

शिवरायांनी वापरलेली युद्धतंत्रे निश्चितच मुघलांच्या काळजात धडकी भरविणारी होती. गनिमी काव्याचा वापर न करता अफाट सैन्यापुढे टिकाव धरणे कोणालाही शक्य नाही, त्यामुळे 'शक्तीपुढे युक्ती' वापरण्याची शिवरायांची कला कौतुकास्पदच म्हणावी लागेल. शाहिस्तेखानाच्या महालात शिरताना वापरलेले चोरपावलांचे कौशल्यसुद्धा धाडसीच म्हणावे लागेल. "भगदाड मोठे करणाऱ्या पहारी चालत होत्या; पण त्यांचे आवाज ऐकू जाण्याची काहीही शक्यता नव्हती. कारण, या खिडकीच्या बाहेर झामरे पाटलांच्या नातवाची वरात मोठमोठ्याने वाजत होती. सनईच्या सुरम्य आवाजात शिवाजी महाराजांच्या पाठोपाठ बाराती मावळे आत शिरत होते. पहाटे स्वैपाक करायचा होता म्हणून असेल किंवा वरातीच्या सनईचा आवाज ऐकून असेल; आचाऱ्यास जाग आली. मुस्कटदाबी करून त्यास शांत करण्यात आले. महाराज आणि चिमणाजी जिना चढून मांजरीच्या पावलांनी माडीवर गेले. तिकडे इतर मावळ्यांनी, दिंडीच्या आत झोपी गेलेल्या हशमांना कळूही दिले नाही की, ते केव्हा मरण पावले. दिंडी दरवाजा उघडला गेला. तानाजी आणि नारायण यांच्यासोबत रक्षकांच्या गणवेशातील मावळे आत शिरले. दरवाजा आतून बंद झाला. हातात खड्ग घेतलेला शिवाजी आपल्या ऐन पुढ्यात उभा राहील, असे शास्ताखानाला आधल्या जन्मीच्यासुद्धा, स्वप्नात वाटले नव्हते. तो भयंकर किंचाळत चित्कारला."[3] शिवरायांच्या धाडसाला त्यांच्या गनिमी काव्याने खूप मोठा आधार दिल्याचे दिसून येते. परकीय शत्रूची दिशाभूल करून त्यांना सळो की पळो करून सोडले जाई. अनेकदा शत्रू कमजोर असेल, तर त्याच्याकडील हत्ती-घोडे, जड-जवाहिरे किंवा मौल्यवान वस्तू घेऊन त्याला सोडून दिले जाई. याचाच अर्थ असा की शिवरायांच्या स्वराज्य संकल्पनेत धाडस, प्रसंगी निष्ठुरतेप्रमाणेच प्रेम, दया या बाबींनाही मोठे स्थान होते.



Scanned with CamScanner

छत्रपती शिवाजी महाराजांची रणनीती समजणे नक्कीच शत्रूला एवढे सोपे नव्हते. विजापूरचा आदिलशहा शिवरायांना शत्रू मानत होता. अफजलखानाच्या मृत्यूनंतर आदिलशहा प्रचंड घाबरला होता. शिवरायांचा बंदोबस्त करण्यासाठी त्याने सिद्दी जोहरची नेमणूक केली. एकदा सिद्दी जोहरला वाटले की आपण शिवाजी राजांना पकडले; परंतु वास्तव काही वेगळेच होते. गनिमी काव्याचे उत्तम उदाहरण ठरेल अशी ही घटना आहे. "बेशक! म्हणत सिद्दी जोहर उठला आणि त्याच वेळी हेजीब नेहमीचे रिवाज न पाळता सरळ डेऱ्यात आला आणि सिद्दीच्या कानाला लागला. त्याने कानात सांगितलेल्या मंत्राने सिद्दीचे रूप पालटले. संतापाने बेभान झालेला सिद्दी शिवावर नजर रोखत ओरडला.

'कोण आहेस तू?'

'मतलब?' शिवा उसन्या धैर्याने म्हणाला, 'मी शिवाजी.'

'झूट! बिलकूल झूट! तो काफर शिवा केव्हाच पळून गेला.'

'तेही खरं आहे.' शिवा शांतपणे म्हणाला.

'मतलब?'

'सिद्दी जोहर! आमचे राजे एवढ्या सहजासहजी शत्रूच्या हाती सापडत नसतात. एव्हाना राजे खूप दूर गेले असतील. आता तुझ्या पंज्यात ते सापडणार नाहीत.'

'पण तू कोण?' सिद्दीचा संयम ढळत होता.

'माझं नाव शिवाच!' शिवा हसून म्हणाला, 'जरा आडनावात फरक आहे. ते शिवाजीराजे भोसले आणि मी शिवा न्हावी.'"[४] या प्रसंगावरून असे दिसून येते की, शिवरायांसाठी आपल्या प्राणाची आहुती देण्यासही मावळे मागे-पुढे पाहत नव्हते. त्यामुळेच स्वराज्य संकल्पनेला अधिक बळकटी प्राप्त झाली. "महाराजांची मंडळी आग्रा शहरांत हिंडत होतीच. आपण शहराची चांगली माहिती करून घेतली पाहिजे, हे त्यांस पक्के ठाऊकच होतें. तानाजी, येसाजी, श्रीधरस्वामी वगैरे मंडळी खुशाल चार सहा घटका शहरांत हिंडून शहराच्या सर्व भागांची माहिती गोळा करण्यासाठी हिंडू लागले. खरकसिंग त्यांचा वाटाड्या बनला. आपणांस जरी स्वस्थ बसावे लागले, तरी आपलीं माणसें आपला कार्यभाग- निदान शहराची माहिती मिळविण्याचा कार्यभाग-करीत आहेत एवढेंच महाराजांस समाधान वाटलें."[५] शिवरायांचा विश्वास संपादन केलेल्या अनेक मावळ्यांनी स्वराज्यासाठी घेतलेले परिश्रम नक्कीच मौलिक आहेत.

कोणत्याही मोहिमेवर जाण्याआधी त्या मोहिमेच्या परिसराची चाचपणी करण्याचे शिवरायांचे कौशल्य प्रेरणादायी होते. "महाराजांनी पुन्हा एकवार त्या येणाऱ्या चौथ्याकडे नीट पाहिलें आणि आपली कफनी काढून हळूच खाली ठेवली; परंतु कफनीच्या आंत महाराजांनी बऱ्याच वस्तु लपवून ठेवल्या असाव्यात, असे निरखून पहाणाऱ्याच्या लक्षात आल्याशिवाय राहिले नसते. त्या लपवून ठेवलेल्या वस्तु म्हणजे स्वरक्षणाकरितां महाराजांनी जवळ बाळगलेली हत्यारे होतीं."[६] शिवरायांनी प्रत्येक प्रसंगी बाळगलेली सावधानता अत्यंत प्रेरक होती. वेळोवेळी त्यांनी प्रसंगावधान राखले नसते तर अनर्थ घडला असता. अफजलखानाच्या वधाच्या प्रसंगी कृष्णाजी कुलकर्णी यांनी शिवरायांवर केलेला वार प्रसंगावधानामुळेच ते चुकवू शकले. याचा अर्थ शिवरायांचे चातुर्य वाखाणण्याजोगे होते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धकौशल्याबद्दल अनेक इतिहासकारांनी लेखन करून ठेवले आहे. "पुढे जितकी शहरें मोगलाईत होती ते जागां चार पांच माणसें वेषधारी करून पाळतीस ठेविलीं. पाळती घेऊन दोघे खबर सांगावयास यावे. दोघांनी तेथें हुशार राहावें. मग लष्कर पाठवून हवेलिया, शहरें मारावीं. ही तजवीज केली."[७] आज संपूर्ण जगात नावलौकिक प्राप्त झालेले शिवरायांचे व्यक्तिमत्त्व नक्कीच ऐतिहासिक व प्रेरणादायी होते. अफाट बुद्धिचातुर्य, कुशल प्रशासकतेमुळेच त्यांना मिळालेली 'रयतेचा राजा' ही उपाधी रास्त असल्याचे दिसून येते. मराठी कादंबरीने शिवरायांच्या विविध पैलूंचा घेतलेला आढावा नक्कीच महत्त्वपूर्ण आहे.

**निष्कर्ष -**

- छत्रपती शिवाजी महाराजांच्या विविध कौशल्यांप्रमाणेच गनिमी काव्याचे कौशल्यही महत्त्वपूर्ण होते.
- गनिमी काव्यामुळेच अल्पसंख्येतील मराठ्यांना अफाट सैन्यशक्ती असलेल्या मुघलांना अनेकदा नामोहरम करता आले.
- मराठी कादंबऱ्यांमधील शिवरायांचे व्यक्तिमत्त्व प्रेरक व आश्वासक वाटते.
- शिवरायांच्या संपूर्ण जीवनाचा आढावा घेतल्यास



Scanned with CamScanner

त्यांच्यातील नावीन्यपूर्ण रणनीतींचा परिचय होऊ लागतो.

- छत्रपती शहाजीराजे, राजमाता जिजाऊ यांच्याप्रमाणेच अनेक विश्वासू मित्र व मावळ्यांनी स्वराज्य स्थापनेत मोलाची भूमिका बजावलेली दिसून येते.
- संपूर्ण भारतवर्ष शत्रूंच्या छायेत वावरत असताना महाराष्ट्रासारख्या मध्य भारतातील दऱ्या-खोऱ्यांच्या प्रांतात छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेला आपला दबदबा नक्कीच ऐतिहासिक आहे.

**संदर्भ ग्रंथ -**


१. जाखोटिया, गिरीश (डॉ.), 'छत्रपती शिवाजी आणि २१ वे शतक', राजेंद्र प्रकाशन, मुंबई, ५ ऑक्टोबर २०१२ (प. आ.), पृ. क्र. १०५

२. देसाई, रणजित, 'श्रीमान योगी', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, एप्रिल २००४ (सतरावी आ.), पृ. क्र. २००

३. देशपांडे, शिरीष गोपाळ, 'शिवछत्रपती', सरोजिनी अकॅडमी, मुंबई, २३ जानेवारी २०१७ (प. आ.), पृ. क्र. १००, १०१

४. देसाई, रणजित, 'पावनखिंड', मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, जून २०१७ (पुनर्मुद्रण), पृ. क्र. १४२, १४३

५. आपटे, ह. ना., 'सूर्यग्रहण', आर्यभूषण मुद्रणालय, पुणे, १९६४ (चौ. आ.), पृ. क्र. ३१४

६. नाथमाधव, 'स्वराज्याची स्थापना', सी. पी. टँक, मुंबई, १८४४, पृ. क्र. ३३१

७. हेरवाडकर, रघुनाथ विनायक (संपा.), 'शिवछत्रपतींचे चरित्र', व्हीनस प्रकाशन, पुणे, एप्रिल १९८६ (प. आ.), पृ. क्र. ७७


◆◆◆◆◆






Scanned with CamScanner